ठाणे, सोमवार दि. ५ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ९८ पाने : ४, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**बांगलादेशातील हिंसाचार**

बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा आरक्षणावरून हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसक घटनेत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत.

......पान २ वर



आयुष्य घडविण्यासाठी संकल्प महत्वाचा : अविनाश धर्माधिकारी

...पान ४ वर

### वंचित बहुजन आघाडीची आरक्षण बचाव यात्रा

# ओबीसी आरक्षणाला 100 टक्के धोका- प्रकाश आंबेडकर

**यवतमाळ : सध्या राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापलेला आहे. मराठा आरक्षणासाठी झगडणारे मनोज जरांगे पाटील हे आम्हाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण हवे आहे, अशी मागणी करत आहेत. तर दुसरीकडे मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्यावे. त्यांना आमच्या प्रवर्गात सामावून घेऊ नये, अशी ओबीसी नेत्यांची मागणी आहे. असे असतानाच दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आरक्षण बचाव यात्रेच्या माध्यमातून आक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य करताना दिसतायत. त्यांनी यवतमाळच्या पुसदमध्ये जाहीर सभेत बोलताना मोठं भाष्य केलंय. कुणबी मराठा हे खरे ओबीसी नाहीत, असं ते म्हणालेत.**

## इथला कुणबी मराठा डबल भूमिका घेतो

विधानसभा ठरावाच्या वेळी कुणबी समाजाची पाटीलकी जागी झाली तर ते आपल्या बाजूने उभारणार नाहीत. कारण इथला कुणबी मराठा डबल भूमिका घेतो. आपल्यामध्ये बसला की स्वत:ला ओबीसी म्हणवतो आणि पाटलांमध्ये बसला की मराठा म्हणतो. त्यामुळे या निवडणुकीत खूणगाठ बांधा मी ओबीसीलाच मतदान करणार..असे आवाहन प्रकाश आंबेडकरांनी केले.

**प्रकाश आंबेडकरांचे खळबळजनक वक्तव्य**



## ..... त्यामुळे ओबीसी आरक्षणाला धोका आहे

कुणबी मराठा हे खरे ओबीसी नाहीत त्यामुळे त्यांच्यापासून सावध रहा. विधिमंडळ सभागृहात १९० कुणबी मराठा आमदार असून केवळ ११ ओबीसी आमदार आहेत. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला १००% धोका आहे, असे खळबळजनक विधान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले. कुणबी हा स्वत:ला ओबीसी म्हणत असला तरी तो सभागृहात मी मराठ्यांसोबत आहे, असे सांगतो. तो धनगरांसोबत नाही, तो माळ्यांसोबत नाही, तो वंजारी, लिंगायत, बंजारा यांच्यासोबत नाही. तो तेली, तांबोळी, कुणबी, लोहार, सोनार यांच्यासोबत तर अजिबातच नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

## एकाही कुणबी मराठा उमेदवाराला मतदान करू नका....

ओबीसी आरक्षणाला १०० टक्के धोका असल्याचं वक्तव्य केल्यानंतर वंचित बहुजनचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आता आणखीएकदा खळबळजनक वक्तव्य केलं आहे. कुणबी मराठा उमेदवाराला मतदान करू नका असं त्यांनी ओबीसींना आवाहन केलंय. विधानसभेत ठरावाच्यावेळी कुणबी समाजाची पाटीलकी जागी झाली तर ते आपल्या बाजूने मतदान करणार नाहीत. असं ते म्हणालेत.

**काय म्हणाले प्रकाश आंबेडकर ?**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी वाशिमच्या पोहरादेवी येथे खळबळ जनक वक्तव्य केलंय. या निवडणुकीत कुणबी मराठा उमेदवाराला मतदान करू नका असं त्यांनी ओबीसींना आवाहन केलं असून विधानसभेत ठरावाच्या वेळी कुणबी समाजाची पाटीलकी जागी झाली तर ते आपल्या बाजूने मतदान करणार नाहीत. त्यामुळे यापुढे ओबीसींनी कुणबी सोडून इतर ओबीसी उमेदवाराला मतदान केलं पाहिजे असं प्रकाश आंबेडकर म्हणालेत.

## आरक्षणाचा फॉर्म्युला आमच्याकडे आहे, मात्र जोपर्यंत आम्हाला सत्ता देणार नाही तोपर्यंत आम्ही तो कोणाला देणार नाही...

आरक्षणाच्या मुद्यावरून सध्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. अशातच वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे राज्यभरात आरक्षण बचाव यात्रा काढत आहे. या यात्रे दरम्यान ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मोठे वक्तव्य केलं आहे. आरक्षण हे सुरक्षित असलं पाहिजे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची मागणी यापूर्वीच मान्य झाली आहे. असे असताना ज्यांना ज्यांना आरक्षण आहे त्यांनी आम्हाला सत्ता द्यावी. त्यांना आरक्षण कसे द्यायचे आणि त्यांचं ताट कसं वेगळं ठेवायचं याचा फॉर्म्युला आमच्याकडे आहे. परंतू जोपर्यंत आम्हाला सत्ता देणार नाही तोपर्यंत आम्ही हा फॉर्म्युला कोणालाही देणार नाही. अस वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केलंय. ते वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी इथं आले असताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

## युती जुडेल का हे आर्थोपेडिक डॉक्टरलाच विचारावं लागेल- प्रकाश आंबेडकर


(सविस्तर वृत्त पान २)

# सुट्टीच्या दिवशी देखील केडीएमसी मुख्यालय व सर्व प्रभगात मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण या योजनेच्या अर्जांची छाननी सुरु!

कल्याण – महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी दिलेल्या निर्देशानुसार महिला व बालकल्याण विभागाच्या उप आयुक्त स्वाती देशपांडे–कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण या योजनेचे काम महापालिका स्तरावर शीघ्र गतीने होण्यासाठी काल महापालिका मुख्यालयात आणि आज कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी देखील महापालिकेच्या मुख्यालयात व–१०–प्रभाग कार्यालयात प्राप्त अर्जांच्या छाननीचे काम जलद गतीने सुरु आहे. या कामी महापालिका क्षेत्रातील अंगणवाडीतील मुख्य सेविका यांचे देखील सहाय्य होत आहे.

या कामासाठी महापालिका मुख्यालयात सहा आयुक्त यांच्या अधिपत्याखाली सकाळी ०६:००ते–०२:०० दुपारी–०२:००ते १०:००व रात्री– १०:०० ते–०६:००या तीन सत्रात मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण या योजनेच्या अर्जांची छाननी करुन ते अंतिम केले जाणार आहेत.

आतापर्यंत कल्याण तालुक्यात–१.०६.६४२–इतके अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी–५२०८५ अर्जांची छाननी झाली आहे–९८७२–इतके अर्ज कागदपत्रातील त्रुटींमुळे अंशत: नामंजूर करण्यात आले आहे, म्हणजेच सदर अर्जातील त्रुटी सबंधित अर्जदारांकडून माहिती घेवून दूर केल्या जातील. एकूण अर्जांपैकी ४२११६–अर्ज आतापर्यंत मंजूर करण्यात आले आहेत आणि नंतर सदर अर्ज अंतिम करण्यात येतील. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी आज मुख्यालयातील विभागांना प्रत्यक्ष भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला. महापालिका क्षेत्रातील पात्र महिला लाभार्थ्यांनी या योजनेचा आवर्जुन लाभ घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी केले आहे.






# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## बांगलादेशातील हिंसाचार

बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा आरक्षणावरून हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसक घटनेत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लावण्यात आला आहे. इंटरनेटही बंद करण्यात आले आहे. भारत सरकारनेही या घटनेनंतर बांगलादेशमधील भारतीय नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करत काही नागरिकांनी अहसहकार आंदोलन सुरू केले आहे. आंदोलक ढाक्यातील सायन्स लॅब चौकात दाखल झाले होते. यावेळी त्यांना अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी सुरू झाली. या घटनेनंतर भारत सरकारनेही बांगलादेशमधील भारतीय नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. काही आंदोलनकांनी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब वैद्यकीय महाविद्यालयासह या भागातील काही कार्यालय आणि आस्थापनांवरही हल्ले केले. विशेष म्हणजे काही आंदोलक लाठ्या-काठ्या घेऊन शाहबाग चौकात जमले, तेव्हा पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. यावेळी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. बांगलादेशमधील भारतीय नागरिकांना कोणतीही मदत हवी असल्यास हेल्पलाईनवर संपर्क करावा, असे आवाहन भारतीय दुतावासाकडून करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी सरकारी नोकऱ्यांसाठी असलेल्या आरक्षणाची पद्धत रद्द करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी मोठे आंदोलन केले होते. यावेळीसुद्धा बांगलादेशमधील विविध भागात हिंसासाचाराच्या घटना घडल्या होत्या. या घटनांमध्ये जवळपास २०० जणांचा मृत्यू झाला होता. तर शेकडो नागरिक जखमी झाले होते. या आंदोलनानंतर अखेर बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने हा आरक्षणासंदर्भातील सरकारचा निर्णय रद्द केला होता. बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकऱ्यांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींच्या वंशजांना देण्यात आलेले ३० टक्के आरक्षण पूर्णपणे रद्द न करता ते कमी केले आहे. दि.२१ जुलै रोजी बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकरीमधील वादग्रस्त आरक्षणाबाबत महत्त्वाचा निर्णय दिला होता. बांगलादेश उच्च न्यायालयाने देशाच्या १९७१ च्या स्वातंत्र्य युद्धात लढलेल्यांच्या वंशजांसाठी सरकारी नोकरीमध्ये ३० टक्के आरक्षण पुनर्स्थापित करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाला विरोध करण्यासाठी म्हणून विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाने आकार घेतला होता. सुरुवातीला बांगलादेशच्या विद्यापीठांमधून सुरु झालेले हे आंदोलन बघता बघता संपूर्ण देशभरात पसरले. या आंदोलनामध्ये १ जुलैपासून मोठा हिंसाचार सुरू झाला आहे. बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने सरकारी नोकऱ्यांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींच्या वंशजांना देण्यात आलेले ३० टक्के आरक्षण पूर्णपणे रद्द न करता ते ५ टक्क्यांवर आणले गेले आहे. या निर्णयानुसार, देशातील ९३ टक्के पदे गुणवत्तेनुसार भरली जातील. उर्वरित २ टक्के पदे वांशिक अल्पसंख्याक, पारलिंगी व्यक्ती आणि अपंग लोकांसाठी राखीव असतील. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय महत्त्वाचा असला तरीही स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींच्या वंशजांसाठी लागू केलेले सर्वच्या सर्व आरक्षण पूर्णपणे रद्द करण्याची आंदोलकांची मागणी आहे. बांगलादेशमधील विद्यापीठांमधून सुरु झालेल्या हिंसाचाराचे लोन आता संपूर्ण देशभरात पसरले आहे. बांगलादेशमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर हिंसाचार पहायला मिळत असून सध्या परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सरकारकडून केले जात आहेत. बांगलादेशमध्ये नोकऱ्यांमधील आरक्षणावरून सरकारने घेतलेल्या निर्णयानंतर हे निषेध आंदोलन आणि हिंसाचार घडत असून त्यामध्ये जवळपास ३०० जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या बांगलादेशमध्ये देशव्यापी कर्फ्यू लागू करण्यात आला असून त्याची मुदत आणखी वाढवण्यात आली आहे. सध्या रस्त्यावर कुणी आल्यास त्याला दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. आरक्षणावरून हिंसाचारात अनेक दुर्दैवी लोकांचा मृत्यू झाला. बांगलादेश सरकारने ही संघर्षमय परीस्थिती वेळीच हाताळली नाही तर अनेक अनर्थ घडतील, असे दिसते.


## जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

- ☆ मिळकट नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१

☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771



* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट

*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.


# 'लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी सामाजिक वसा जपला'

पनवेल (प्रतिनिधी)- आपल्या खिशातील पैसे खर्च करून समाजोपयोगी कामे करणारे मोजकीच आहेत मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर हे सतत आणि अखंडपणे समाजाची सेवा करण्याचे काम करत आहेत, त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांनी सामाजिक वसा जपला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी काल खांदा कॉलनी येथे झालेल्या आरोग्य महाशिबिरात केले.

लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रमे राबविणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पार्टी, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने (रविवार, दि.०४ ऑगस्ट) १६ वे 'विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिर' माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली उत्कृष्ट नियोजनात पार पडला.



या महाशिबिराचे उदघाटक म्हणून आमदार रवीशेठ पाटील बोलत होते.

आ. पाटील यांनी पुढे म्हंटले की, डॉक्टर हे गुणकारी असतात त्यांच्याकडे देवरूपाने पाहिले जातात. सन २००६ पासून कोरोनाचे दोन वर्षे अपवाद वगळता हे महाशिबीर अखंडपणे सुरु आहे. त्याचे नियोजन उत्तम असल्यामुळेच हा उपक्रम अविरतपणे सुरु आहे, त्यामुळे या उपक्रमाला तोड नसून हि सेवा फक्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे या विभागाला मिळाली आहे. नावाने खूप दानशूर होतात पण कर्तृत्वाने खरे दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत, असे त्यांनी आपल्या भाषणात आवर्जून नमूद करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी सेवेचे व्रत घेतलेच आहे पण त्याचबरोबरीने येथील माणसाला काय आवश्यक आहे याची जाणीवही त्यांच्याकडे आहे, त्याप्रमाणे त्यांच्याकडे कामाचा वसा असून विधिमंडळातील ते एक बुलंद आवाज आहेत, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून, हे महाशिबीर यशस्वी करण्यासाठी डॉक्टर, संस्था व त्यांचे सहकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांचे योगदान महत्वाचे ठरले असल्याचे सांगितले आणि त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देऊन त्यांच्याप्रती आभार मानले. अनेकदा कामाचे कौतुक होत असते पण देवाने दिले ते समाजासाठी देणे आपले कर्तव्य आहे, आपणही समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून काम करण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्यामुळे सामाजिक बांधिलकीला प्रथम प्राधान्य देत असतो असे सांगतानाच वाढदिवसाचे अभिष्टचिंतन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर असलेले प्रेम कायम वृद्धिगत करा, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हंटले.

यावेळी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी, महाशिबिराच्या प्रथम ते आजपर्यंतच्या आयोजनाबद्दल माहिती दिली. यावेळी नगरसेवक हरेश केणी, मनोहर म्हात्रे, मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, राजू सोनी, अमर पाटील, अजय बहिरा, तेजस कांडपिले, प्रभाकर बहिरा, विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, मोनिका महानवर, नीता माळी, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, तालुकाध्यक्षा कमला देशेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, ज्ञानेश्वर घरत, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, अमोघ ठाकूर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमरीश मोकल, शशिकांत शेळके, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

### गणेशोत्सवाचे वेध.....

## सलग सुट्ट्यांमुळे रेल्वेची प्रतीक्षा यादी पूर्ण...

मुंबई : मध्य, पश्चिम आणि कोकण रेल्वे प्रशासनाने गणेशोत्सवानिमित्त विशेष रेल्वगाड्या सोडल्या आहेत. त्यांचे आरक्षण सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच प्रतीक्षा यादी पूर्ण झाली. ऑगस्ट महिन्यात सलग सुट्ट्या आणि सणाच्या निमित्ताने मुंबईहून कोकणात जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. मात्र, या कालावधीत धावणाऱ्या रेल्वेगाड्यांच्या प्रतीक्षा यादीची मर्यादा संपल्याचे संदेश प्रवाशांना येत आहेत. स्वातंत्र्यदिन व रक्षाबंधननिमित्त सलग सुट्ट्यामध्ये मुंबई ते चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडीदरम्यान स्वतंत्र विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. १५ ते १९ ऑगस्टपर्यंत सलग सुट्ट्या आल्याने, मुंबई ते सावंतवाडी दरम्यान धावणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांतील आरक्षणासाठी भलीमोठी प्रतीक्षा यादी आहे. तर, १४ ऑगस्टच्या रात्रीपासूनच्या रेल्वेगाड्यांच्या प्रतीक्षा यादीची मर्यादा पार केल्याने 'रिग्रेट'चा संदेश दाखवण्यात येत आहे. 'रिग्रेट' हा अनावर गर्दीचा निदर्शक आहे. तसेच, शुक्रवार, शनिवार, रविवार अशा लागून आलेल्या सुट्टीमुळे रेल्वेगाड्यांना गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रतीक्षा यादी आणि अनारक्षित प्रवाशांची संख्या पाहता चिपळूण, रत्नागिरी आणि सावंतवाडीसाठी विशेष रेल्वेगाड्या सोडणे अपेक्षित आहे.

त्यापूर्वी, २६ जानेवारी २०२४ रोजी सुट्टीच्यावेळी जादा रेल्वेगाड्या न सोडल्याने आरक्षण न मिळालेल्या प्रवाशांनी वातानुकूलित डब्यांतही गर्दी केली होती. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर, येथून चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडीदरम्यान स्वातंत्र्यदिन व रक्षाबंधनानिमित्त विशेष गाड्या सोडाव्यात, अशी मागणी कोकण विकास समितीकडून केली आहे. सण-उत्सवानिमित्त मुंबईतून कोकणात जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे नियमित आणि विशेष रेल्वेगाड्यांना कायम गर्दी असते. त्यात सलग सुट्टी असल्यास, प्रवाशांची गर्दी विभाजित करण्यासाठी जादा रेल्वेगाड्या सोडणे आवश्यक आहे, असे कोकण विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत दरेकर यांनी सांगितले.


### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे हे अनुभवी कंत्राटदारांकडून ठामपा क्षेत्रामध्ये कळवा प्रभाग समिती अंतर्गत कावेरी सेतू येथे बांधण्यात आलेल्या वाचनालयास फर्निचर पुरविणे.." या कामासाठी ई-टेडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. निविदा सादर करणाऱ्या ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय / निमशासकीय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाची कार्यवाही केली/ सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदर निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सूचना व निविदाप्रपत्र ठाणे महानगरपालिकेच्या http.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.०५.०८.२०२४ ते दि.१२.०८.२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेडरींग पध्दतीने दि.१२.०८.२०२४ रोजी दुपारी १६.०० पर्यंत स्वीकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.१४.०८.२०२४ रोजी दुपारी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा मु/२३०/२०२४-२५ — सही/-

दि.०२.०८.२०२४ — कार्यकारी अभियंता, ठाणे महानगरपालिका, ठाणे

Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in



### ठाणे महानगरपालिका, ठाणे

मलनि:सारण विभाग

निविदा सुचना- व्दितीय मागणी

ठाणे महानगरपालिका हद्दीतील १) वागळे प्रभाग समिती क्षेत्रात अस्तित्वातील मलनिःसारण व्यवस्थेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती (स्थापत्य) चे काम करणे (सन २०२४-२५) व (२) नौपाडा-कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात अस्तित्वातील मलनि:सारण व्यवस्थेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती (स्थापत्य) चे काम करणे (सन २०२४-२५) करीता जाहीरात क्र. ठामपा/पीआरओ/ मलनि:सारण/ १२६/२०२४-२५ दि.१५/०७/२०२४ अन्वये ऑनलाईन निविदा मागविण्यात आले होते. तथापि, अल्पप्रतिसाद मिळाल्यामुळे या निविदा सुचनेद्वारे सदर कामांसाठी द्वितीय मागणी देवून निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदाराविरुद्ध शासकीय / निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे,अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र https:/mahatenders.gov.in वर दि.०५/०८/२०२४ पासुन ते १२/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. सदर निविदा दि.१२/०८/२०२४ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरच्या निविदांचा तांत्रिक निविदा शक्य झाल्यास दि.१३/०८/२०२४ रोजी उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींच्या समक्ष सायंकाळी १७.०० वा. उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ मलनि:सारण/२३४/२०२४-२५ — सही/-

दि:०२.०८.२०२४ — नगर अभियंता, ठाणे महानगरपालिका, ठाणे

Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की मौजे दिघा, नवी मुंबई येथील जमिन गट नं. ५९ ही जमिन महाराष्ट्र शासनाने औद्योगिक कारणाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केल्याने आमचे अशिल सौ. हेमांक्षी प्रविण माहूलकर राहणार रामस्मृती निवास, विठ्ठल मंदिराचे बाजूला, विटावा कोळीवाडा, कळवा (पश्चिम) ठाणे ४०० ६०५ यांस प्रकल्पबाधीत म्हणून देकार पत्र जावक नं. एमआयडीसी/महापे/टीटीसी/पीओपी/अे ५५२१५ दिनांक १५/०२/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणाऱ्या, क्षेत्रफळ १०० चौरस मीटर भुखंडाबाबत श्री. शंकर दत्तु धोत्रे यांनी फसवणूकीने मा. सह दुय्यम निबंधक ठाणे-९ यांचे दप्तरी निष्पादीत केलेले दिनांक १८/०२/२०२२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र नोंदणी क्र. २७२३ व त्या अनुषंगाने केलेले पुढील सर्व करार व दस्ताऐवज रद्द केलेले आहेत.

तरी या नोटीसव्दारे तमाम लोकांस खबर करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पबाधीत म्हणून मिळणाऱ्या भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार श्री. शंकर दत्तु धोत्रे वा त्यांचे प्रतिनिधी, वा त्यांचेकडुन अधिकार ग्रहण करणारे व्यक्तिंशी करु नये. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राचे व इतर दस्ताचे आधारे व्यवहार केल्यास तो आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे देकार पत्र जावक नं. एमआयडीसी / महापे / टीटीसी/ पीओपी/अे ५५२१५ दिनांक १५/०२/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणारा भुखंड क्षेत्र १००.

सही
रशिकांत व. थोरवे
वकील

कार्यालयः
०१, रजवि प्लाझा, ग. मो. कोळी मार्ग, चेंदणी कोळीवाडा, ठाणे पुर्व



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की मौजे दिघा, नवी मुंबई येथील जमिन गट नं. ५९ ही जमिन महाराष्ट्र शासनाने औद्योगिक कारणाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केल्याने आमचे अशिल श्री. चिराग शुभकांत खारकर राहणार रामस्मृती निवास, विठ्ठल मंदिराचे बाजूला, विटावा कोळीवाडा, कळवा (पश्चिम) ठाणे ४०० ६०५ यांस प्रकल्पबाधीत म्हणून देकार पत्र जावक नं. एमआयडीसी/महापे/टीटीसी/पीओपी/अे ५५४०८ दिनांक १५/०२/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणाऱ्या, क्षेत्रफळ १०० चौरस मीटर भुखंडाबाबत मे. नेस्टेरिटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर यांनी फसवणूकीने मा. सह दुय्यम निबंधक ठाणे-९ यांचे दप्तरी निष्पादीत केलेले दिनांक १६/०२/२०२२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र नोंदणी क्र. २५५४ व त्या अनुषंगाने केलेले पुढील सर्व करार व दस्ताऐवज रद्द केलेले आहेत.

तरी या नोटीसव्दारे तमाम लोकांस खबर करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पबाधीत म्हणून मिळणाऱ्या भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार मे. नेस्टेरीटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर वा त्यांचे प्रतिनिधी, वा त्यांचेकडुन अधिकार ग्रहण करणारे व्यक्तिंशी करु नये. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राचे व इतर दस्ताचे आधारे व्यवहार केल्यास तो आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे देकार पत्र जावक नं. एमआयडीसी / महापे / टीटीसी/ पीओपी/अे ५५४०८ दिनांक १५/०२/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणारा भुखंड क्षेत्र १००.

सही
रशिकांत व. थोरवे
वकील

कार्यालयः
०१, रजवि प्लाझा, ग. मो. कोळी मार्ग, चेंदणी कोळीवाडा, ठाणे पुर्व


## दुचाकी वर आलेल्या मोबाईल चोरट्यांनी रिक्षातील महिलेचा मोबाईल खेचून झाले फरार

ठाणे - मुलुंड येथून मागे वाडेकर उबेर रिक्षाने निघालेल्या तक्रारदार सुनिला अनंत हिवराये(४२) यांच्या हातातील मोबाईल दुचाकीवरील दोघा चोरट्यांनी घेऊन पोबारा केला. घटना बुधवारी(ता-१ऑगस्ट) रोजी नाशीक मुंबई हायवे रोड रूस्तमजी कटचे पूर्वी रात्री घडली. तक्रारदार सुनिता या थिएटर्स कलाकार आहेत. याप्रकरणी तक्रारदाराने कापूरबावडी पोलीस ठाण्यामध्ये दोघा अज्ञात इसमाविरोधात मोबाईल खेचून नेल्याची तक्रार नोंदवली आहे.

## युती जुडेल का हे आर्थोपेडिक डॉक्टरलाच विचारावं लागेल- प्रकाश आंबेडकर

(पान १ वरून) भाजप आणि शिवसेना हे जरी बहुजन समाजाचे राजकारण करत असले तरी असं करत असल्याचे त्यांनी कधी दाखवलं नाही. ते बहुजनांशी जुळले असं दाखवलं नसल्याने इफेक्टिव्ह असलेल्या पार्टीला आम्ही आमंत्रित केलंय. लोकसभा निवडणुकामध्ये वंचित आणि शिवसेना यांची युती संपुष्टात आली. मात्र, विधानसभा निवडणूक दरम्यान ही युती अबाधित राहील का? या प्रश्नावर उत्तर देताना, एकदा युती तुटलेली ती जुळत नसते, असं उत्तर प्रकाश आंबेडकर यांनी दिले. तर पुन्हा युती चे चान्स आहेत का, या बाबत विचारले असता मिश्किल उत्तर देत आर्थोपेडिक डॉक्टरला विचारावं लागेल असे उत्तर आंबेडकर यांनी दिले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की मौजे दिघा, नवी मुंबई येथील जमिन गट नं. ५९ ही जमिन महाराष्ट्र शासनाने औद्योगिक कारणाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केल्याने आमचे अशिल सौ. पुष्पा अविनाश आवास्कर राहणार स्वतःचे घर, कोळीवाडा, पेण, जिल्हा रायगड ४०२१०७ यांस प्रकल्पबाधीत म्हणून देकार पत्र जावक नं. एमआयडीसी/महापे/टीटीसी/पीओपी/अे २९२४९ दिनांक २५/०१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणाऱ्या, क्षेत्रफळ १०० चौरस मीटर भुखंडाबाबत श्री. शंकर दत्तु धोत्रे यांनी फसवणूकीने मा. सह दुय्यम निबंधक ठाणे-९ यांचे दप्तरी निष्पादीत केलेले दिनांक १८/०२/२०२२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र नोंदणी क्र. २७१९ व त्या अनुषंगाने केलेले पुढील सर्व करार व दस्ताऐवज रद्द केलेले आहेत.

तरी या नोटीसव्दारे तमाम लोकांस खबर करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पबाधीत म्हणून मिळणाऱ्या भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार श्री. शंकर दत्तू धोत्रे वा त्यांचे प्रतिनिधी, वा त्यांचेकडुन अधिकार ग्रहण करणारे व्यक्तिंशी करु नये. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राचे व इतर दस्ताचे आधारे व्यवहार केल्यास तो आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे देकार पत्र जावक नं. एमआयडीसी / महापे / टीटीसी/ पीओपी/अे २९२४९ दिनांक २५/०१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणारा भुखंड क्षेत्र १००.

सही
रशिकांत व. थोरवे
वकील

कार्यालयः
०१, रजवि प्लाझा, ग. मो. कोळी मार्ग, चेंदणी कोळीवाडा, ठाणे पुर्व



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की मौजे दिघा, नवी मुंबई येथील जमिन गट नं. ५९ ही जमिन महाराष्ट्र शासनाने औद्योगिक कारणाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केल्याने आमचे अशिल श्री. दत्तात्रय रामभाऊ खारकर राहणार रामस्मृती निवास, विठ्ठल मंदीराचे बाजूला, विटावा कोळीवाडा, कळवा (पश्चिम) ठाणे ४०० ६०५ यांस प्रकल्पबाधीत म्हणून देकार पत्र जावक नं. एमआयडीसी/महापे/टीटीसी/पीओपी/अे २९२५० दिनांक २५/०१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणाऱ्या, क्षेत्रफळ १०० चौरस मीटर भुखंडाबाबत मे. नेस्टेरीटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर यांनी फसवणूकीने मा. सह दुय्यम निबंधक ठाणे-९ यांचे दप्तरी निष्पादीत केलेले दिनांक १०/०२/२०२२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र नोंदणी क्र. २२१६ व त्या अनुषंगाने केलेले पुढील सर्व करार व दस्ताऐवज रद्द केलेले आहेत.

तरी या नोटीसव्दारे तमाम लोकांस खबर करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पबाधीत म्हणून मिळणाऱ्या भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार मे. नेस्टेरीटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर वा त्यांचे प्रतिनिधी, वा त्यांचेकडुन अधिकार ग्रहण करणारे व्यक्तिंशी करु नये. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राचे व इतर दस्ताचे आधारे व्यवहार केल्यास तो आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे देकार पत्र जावक नं. एमआयडीसी / महापे / टीटीसी/ पीओपी/अे २९२५० दिनांक २५/०१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणारा भुखंड क्षेत्र १००.

सही
रशिकांत व. थोरवे
वकील

कार्यालयः
०१, रजवि प्लाझा, ग. मो. कोळी मार्ग, चेंदणी कोळीवाडा, ठाणे पुर्व



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की मौजे दिघा, नवी मुंबई येथील जमिन गट नं. ५९ ही जमिन महाराष्ट्र शासनाने औद्योगिक कारणाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केल्याने आमचे अशिल श्री. शशिकांत रामभाऊ खारकर राहणार रामस्मृती निवास, विठ्ठल मंदीराचे बाजूला, विटावा कोळीवाडा, कळवा (पश्चिम) ठाणे ४०० ६०५ यांस प्रकल्पबाधीत म्हणून देकार पत्र जावक नं. एमआयडीसी/महापे/टीटीसी/पीओपी/अे २९२५२ दिनांक २५/१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणाऱ्या, क्षेत्रफळ १०० चौरस मीटर भुखंडाबाबत मे. नेस्टेरीटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर यांनी फसवणूकीने मा. सह दुय्यम निबंधक ठाणे-९ यांचे दप्तरी निष्पादीत केलेले दिनांक १०/०२/२०२२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र नोंदणी क्र. २२१४ व त्या अनुषंगाने केलेले पुढील सर्व करार व दस्ताऐवज रद्द केलेले आहेत.

तरी या नोटीसव्दारे तमाम लोकांस खबर करण्यात येते की उपरोक्त प्रकल्पबाधीत म्हणून मिळणाऱ्या भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार मे. नेस्टेरीटी डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड चे संचालक श्री. राजीव जयंत अभ्यंकर वा त्यांचे प्रतिनिधी, वा त्यांचेकडुन अधिकार ग्रहण करणारे व्यक्तिंशी करु नये. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राचे व इतर दस्ताचे आधारे व्यवहार केल्यास तो आमचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे देकार पत्र जावक नं. एमआयडीसी / महापे / टीटीसी/ पीओपी/अे २९२५२ दिनांक २५/०१/२०२२ नुसार हॉटेल उभे करणेकामी भाडेपट्टयाने मिळणारा भुखंड क्षेत्र १००.

सही
रशिकांत व. थोरवे
वकील

कार्यालयः
०१, रजवि प्लाझा, ग. मो. कोळी मार्ग, चेंदणी कोळीवाडा, ठाणे पुर्व

## प्रो गोविंदा सीझन २ मधील१६ संघांचा नामकरण व जर्सी अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

# १६ संघ नव्या दमात, नव्या रुपात अंतिम फेरीत धडकणार






भाईंदर : प्रो गोविंदा सीझन २ मध्ये अंतिम फेरीत निवड झालेल्या १६ संघांचे नामकरण व जर्सी अनावरण सोहळा ताज लँड्स एंड हॉटेल, बांद्रा मुंबई येथे पार पडला. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश सरनाईक, डोम सिनेयुग कंपनीचे संचलाक अध्यक्ष मोहम्मद मोरानी, डोम एन्टरटेन्मेंटचे व्यवस्थापकीय संचालक मजहर नाडियादवाला आदी मान्यवर उपस्थित होते.

गोविंदा या खेळाला राष्ट्रीय दर्जा प्राप्त व्हावा त्याचप्रमाणे या खेळाचे व्यावसायिकीकरण व्हावे यासाठी प्रो गोविंदा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. ज्या प्रमाणे क्रिकेट, कबड्डी खेळाला व्यासपीठ मिळून हा खेळ मोठा झाला. त्याचप्रमाणे गोविंदा या मराठमोळा खेळाला मोठं करण्यासाठी व त्याला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मागील दोन वर्षांपासून आमदार प्रताप सरनाईक यांच्या पुढाकाराने व प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश नेतृत्वात प्रो गोविंदा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा प्रो गोविंदा सीझन २ मोठ्या जल्लोषात दि. १८ ऑगस्ट, २०२४ रोजी वरळी येथील NSCI डोम येथे होणार आहे.

प्रो गोविंदा सीझन २ साठी १६ संघांची निवड करण्यात आली. या संघांचे नामकरण, अलॉटमेंट प्रक्रिया आज पूर्ण करण्यात आली तसेच १६ संघांच्या जर्सीचे अनावरणही करण्यात आले. आयपीएल प्रमाणे प्रत्येक संघ एक एक मालकाने निवडला असून पुढील सीझनपर्यंत हे संघ या मालकांकडे राहणार आहेत.

यावेळी आमदार प्रताप सरनाईक म्हणाले की, मी स्वप्न पाहिलं होते की आपला मराठमोळ्या गोविंदाचे रूपांतर स्पोर्ट्समध्ये व्हावे ही इच्छा युवासेना कार्याध्यक्ष तथा प्रो गोविंदा लीग अध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या नेतृत्वात प्रो गोविंदाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे याचे समाधान वाटते.

प्रो गोविंदा खेळाचे व्यावसायिकीकरण तसेच या खेळाला प्रोफेशनल टच मिळावा यासाठी आज अलॉटमेंट प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या माध्यमातून गोविंदा खेळाला नक्कीच प्रतिष्ठा प्राप्त होईल व खेळाडूंमध्ये आत्मविश्वास दृढ होईल असा विश्र्वास प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी व्यक्त केला.

### गोविंदा पथकाचे नाव व मालक यांची यादी पुढीलप्रमाणे

१. कोकण नगर (कोकण गिन्ट्स) - डॉ. नलीन गुप्ता
२. जय जवान (सातारा सिंघम) - प्रतीक शेळके
३. यश गोविंदा पथक ( लातूर लेजेण्ड्स) - विनय चौघ
४. श्री आग्रेश्वर गोविंदा पथक (नाशिक चॅलेंजर) - श्री. अजित सिंग मित्रा
५. शिव गणेश गोविंदा (संभाजी नगर रॉयल) - विजय पटेल
६. हिंदू एकता गोविंदा पथक (रायगड रॉयल) - श्रीमती अनुष्का गुप्ता आणि श्री. रोहन गुप्ता
७. ओम ब्रह्मांड साई गोविंदा ( सेट्रल मुंबई) - चंद्रेश विठलानी
८. ओम साई सेवा मंडळ ( नवी मुंबई स्ट्राईकर) - अर्जुन कंधारी
९. बाल उत्सव गोविंदा ( मिरा भाईंदर योद्धा) - सिद्धेश कदम
१०. विघ्नहर्ता गोविंदा पथक (पुणे पँथर) - हरमीत आणि मनमित
११. अष्टविनायक गोविंदा पथक (अमरावती ग्लाडीटर्स)
१२. बालवीर गोविंदा पथक (कोल्हापूर किंग) मोहित सिंघल
१३. शिव साई क्रीडा मंडळ (नागपूर निन्जा) - विजय जैन
१४. आर्यन्स गोविंदा पथक ( ठाणे टायगर) - गोपाळ लालवाणी
१५. साईराम गोविंदा पथक (बारामती ब्लास्टर) - धीरज जेठानी
१६. हिंदमाता गोविंदा पथक (वेस्टर्न मुंबई) - भावेश शेठ



ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात, क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## आजचे वृक्षारोपण हा पालिकेने घेतलेला चांगला उपक्रम आहे : खा. श्रीकांत शिंदे

ठाणे : अडिवली ढोकळी येथे वनविभागाचे वनजमिनीवर आजचे वृक्षारोपण हा महापालिकेने घेतलेला चांगला उपक्रम आहे, असे उद्गार खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी आज काढले. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे शुभहस्ते अडिवली ढोकळी येथे वनविभागाचे वनजमिनीवर भव्य वृक्षरोपण मोहिमेचा कार्यक्रम आज संपन्न झाला. त्यावेळी बोलताना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी हे उद्गार काढले. समाजातील सर्व घटकांना एकत्रित करुन ही वृक्ष लागवड होत आहे. या वृक्ष लागवडीमुळे जास्तीत जास्त वनक्षेत्र निर्माण होईल, असेही ते पुढे म्हणाले.

या वृक्षारोपण समयी शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, शिवसेना डोंबिवली शहर प्रमुख राजेश मोरे, महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, पर्यावरण विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव, रेंज फॉरेस्ट ऑफीसर विवेक नातु, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, योगेंद्र राठोड,



मनोज सांगळे, शैलेश मळेकर, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, किशोर ठाकुर, उद्यान विभागाचे अनिल तामोरे, महेश देशपांडे, महापालिकेचे माजी पदाधिकारी, माजी पालिका सदस्य उपस्थित होते.

यावेळी सदर परिसरात देशी प्रजातीची सुमारे १२०० झाडांची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये बहावा, पळस, जांभुळ, बकुळ, करंज, आवळा, फणस, कांचन, कदंब या देशी प्रजातीच्या झाडांचा अंतर्भाव आहे.




भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी रवि जाधव आणि अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




## छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले निर्माण केलेले स्वराज्य म्हणजेच महाराष्ट्र धर्म : अनुप मालंडकर

भिवंडी : छत्रपती शिवाजी महाराजांमुळे महाराष्ट्राला समृद्ध इतिहास आहे. हा इतिहास जाणून घेण्याकरता प्रत्येकाने गडकिल्ल्यावर जाणे आवश्यक आहे लहान मुलांना, विद्यार्थी वर्गाला या गड किल्ल्यांची माहिती द्या. आपल्या महाराष्ट्राचा इतिहास हा तेजोमय आहे.या तेजाची ओळख करून द्या. या स्वराज्याच्या मातीला शौर्याची परंपरा आहे, या मातीतून छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य, महाराजांचे स्वराज्य म्हणजे महाराष्ट्र धर्म होय, ज्या मध्ये सर्व जातींना एकत्र ठेवणारा, आपल्या भागवत धर्माचे, संस्कृतीचे रक्षण करणे म्हणजेच महाराष्ट्र धर्म होय, असे उद्गार भ्रमर संस्थेचे संस्थापक अनुप मालंडकर यांनी काढले.



लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्ताने वाचन मंदिर व टिळक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीछत्रपती शिवाजी महाराज आणि महाराष्ट्र धर्म या विषयावर ठाण्याच्या गडकिल्ले भ्रमंती करणारे भर्मर संस्थेचे प्रमुख अनुप मालंडकर यांचे व्याख्यान टिळक मंदिर सभागृहात आयोजित केले होते त्यावेळेला ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वाचन मंदिराचे अध्यक्ष सुधीर सिंगासने, टिळक मंदिर विश्वस्त गणेश दांडेकर उपस्थित होते. आपला विषय मांडताना मालंडकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला समृद्ध असा शेकडो वर्षापासून चा इतिहास आहे, इसवीसन ६०० वर्षापासून महाराष्ट्राचा उल्लेख वेगवेगळ्या साहित्यात आढळून येतो. छत्रपती शिवाजी महाराज व त्यानंतर संभाजी महाराज, पेशव्यांनी एका वेळेला मराठ्यांचे राज्य हे संपूर्ण देशभर होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी निमार्ण केलेल्या किल्ल्यांमुळे या महाराष्ट्राला स्वराज्याचा इतिहास निर्माण झाला आहे, प्रत्येक गड किल्ल्याला इतिहास आहे हा गड किल्ल्याचा इतिहास आपण जाणून घेतला पाहिजे त्याची माहिती करून घेतली पाहिजे आपल्या पुढच्या पिढी करता याची माहिती देता आली पाहिजे. याकरता सर्व पालकांनी आपल्या मुलांसह सुट्टीच्या दिवसात एक तरी किल्ला बघावा व त्याची माहिती करून घ्यावी तरच महाराष्ट्र धर्म आणि महाराष्ट्र संस्कृती काय आहे हे विद्यार्थी वर्गाला कळेल, छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला आरमाराचे महत्त्व पटवून दिले, गोमांतक मुक्ती आंदोलन व विविध गनिमी काव्याने महाराजांनी स्वराज्य कसे निर्माण केले याचे अनेक दाखले देत त्यांनी आपला विषय मांडला. आपल्या भागवत धर्मसंस्कृतीचे रक्षण म्हणजेच महाराष्ट्र धर्म होय, हाच धर्म महाराजांना अभिप्रेत होता. प्रत्येक किल्ल्याला शुर, पराक्रमाचा वारसा आहे, या किल्ल्याच्या मातीचे संस्कार शौर्य परंपरा यांची गाथा सांगणाऱ्या गोष्टींची माहिती नवीन पिढीला करून द्या. असा संदेश ठाण्याचे भ्रमर संस्थेचे संस्थापक अनुप मालंडकर यांनी दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक कार्य सहकार्य व मिलिंद पळसुले यांनी केले तर आभार प्रदर्शन यशवंत कुंटे यांनी केले.

## महसूल पंधरवडा अंतर्गत कल्याण तालुक्यातील जांभूळ येथे विविध उपक्रमांचे आयोजन

### आमदार किसन कथोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना करण्यात आले विविध लाभ वाटप

ठाणे : महसूल पंधरवडा अंतर्गत दि. २ ऑगस्ट रोजी कल्याण तालुक्यातील जांभूळ येथे आमदार किसन कथोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण, वृक्षारोपण, विविध दाखल्यांचे वाटप असे विविध उपक्रम संपन्न झाले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा कृषी विकास अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी



अधिकारी (महिला व बालविकास) संजय बागूल, तहसिलदार सचिन शेजाळ, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते, कल्याण वनपरिक्षेत्र अधिकारी रघुनाथ चन्ने, सरपंच परिक्षित पिसाळ, उपसरपंच अशोक शिंदे व ग्रामपंचायत इतर सदस्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व जांभूळ ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या हस्ते महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तीन हेक्टर क्षेत्रावर बांबू वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. त्याचप्रमाणे हिंदुस्तान पेट्रोलियम ऑईल कंपनीच्या सहकार्याने सीएसआर निधीच्या माध्यमातून दहा हेक्टर क्षेत्रावर जांभूळ वृक्ष लागवडीचा शुभारंभही करण्यात आला. या माध्यमातून शासकीय गुरचरण जमिनीवर जवळपास १५ हजार वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

या उपक्रमानिमित्त जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना त्याचप्रमाणे मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण या दोन्ही योजनांची माहिती देवून या दोन्ही योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याकरिता आवाहन केले.

याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांना दाखले वाटप, आदिवासी महिलांना रेशनकार्ड वाटप, जन्म-मृत्यू दाखल्यांचे वाटप, बचतगटांना फिरत्या निधीचे वाटप, श्रावण बाळ व संजय गांधी योजनेचा लाभ वाटप हे लाभ वाटपही करण्यात आले.

## महिलांचे आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता विषयक योग शिबिराला उत्साही प्रतिसाद

नवी मुंबई : स्वच्छता हा सर्वांसाठीच महत्वाचा विषय असून स्वच्छतेचा संबंध थेट आरोग्याशी असल्याने नवी मुंबई शहराच्या स्वच्छतेसाठी मनापासून काम करणाऱ्या महिला स्वच्छताकर्मींच्या आरोग्याची काळजी घेत 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत 'महिलांचे आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता विषयक योग शिबीरा'चे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांनी या शिबीराला मिळालेला उत्तम प्रतिसाद उत्साह वाढविणारा असल्याचे मत व्यक्त केले.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागावर भर देत स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविले जात आहे. यामध्ये 'महिलांचे आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता विषयक योग शिबीरा'च्या स्वरूपात एक विशेष उपक्रम वाशी येथील महात्मा फुले भवन याठिकाणी राबविण्यात आला.

याप्रसंगी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शुभा डुकले यांनी महिलांच्या विविध आरोग्य समस्या व त्या टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबद्दल उपस्थित स्वच्छताकर्मी महिलांशी थेट संवाद साधला. महिलांमार्फत विचारण्यात आलेल्या आरोग्याविषयक विविध शंकाचेही त्यांनी निरसन केले. स्वच्छताकर्मींचा दिनक्रम मांडत त्यामध्ये वेळ काढून आरोग्य जपणुकीविषयी करावयाच्या मोलाच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या.

याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, वाशी विभागाचे सहा.आयुक्त सागर मोरे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे, अभियंता वैभव देशमुख आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन तथा लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख श्रीम.रिचा समित यांच्या संयोजनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छतासखी महिलांसाठीच्या विशेष स्वच्छता, आरोग्य व योग शिबीरामध्ये श्रीम.रिचा समित यांनी उपस्थित महिला स्वच्छताकर्मीकडून करायला सहज अशा योगक्रियांची प्रात्यक्षिके करून घेतली.

यावेळी उपस्थित महिलांना 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' अभियानाची माहिती देण्यात आली व पात्र महिलांनी त्वरित अर्ज भरावेत असे आवाहन करण्यात आले. त्याठिकाणीही उपस्थित महिलांसह स्वच्छतेची सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली. या आरोग्य व योग शिबीराच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिका शहर स्वच्छतेसाठी दिवसरात्र कार्यरत असणाऱ्या स्वच्छताकर्मी महिलांच्या आरोग्याप्रती विशेषत्वाने जागरूक असल्याचे दिसून आले.

## नवी मुंबई पालिका क्षेत्रात पाणी गुणवत्ता तपासणीची विशेष चाचणी मोहीम संपन्न

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणारा पाणीपुरवठा स्वच्छ व शुध्द असावा याची काळजी महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने घेण्यात येत असून विविध ठिकाणांहून दररोज ११० पाणी नमुने तपासण्यात येत असतात.

सध्याच्या पावसाळी कालावधी लक्षात घेऊन यामध्ये वाढ करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने पाणीपुरवठा विभागास देण्यात आले होते, त्या अनुषंगाने रविवारी सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्याने नागरिक घरी असतात हे लक्षात घेऊन आयुक्त महोदयांच्या संकल्पनेतून पाणी गुणवत्ता तपासणीची विशेष मोहीम आज संपूर्ण महापालिका क्षेत्रात व्यापक प्रमाणात राबविण्यात आली. यामध्ये नेहमीपेक्षा १० पट अधिक म्हणजे १००० पेक्षा अधिक पाणी नमुने महापालिका क्षेत्रातील विविध भागांतून संकलित करण्यात आले व त्यांची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासण्यात आली. या विशेष मोहीमेचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.




केंद्र सरकारमार्फत 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' हे विशेष अभियान जाहीर करण्यात आले असून त्या अनुषंगाने स्वच्छता व आरोग्याचा संदेश अधोरेखित करण्यात आलेला आहे. या अभियानात आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका उत्साहाने सहभागी झाली असून स्वच्छता आणि आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम लोकसहभागावर भर देत मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहेत.

अशाच प्रकारे नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा करून त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत पाणी गुणवत्ता तपासणी करण्याचा हा अभिनव उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात आला असल्याचे अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी सांगितले.

या पाण्याच्या चाचणी मोहीमेंतर्गत महापालिका क्षेत्रातील घरे, सोसायट्या, गावठाण व झोपडपट्टी भाग, वाणिज्य संकुले, शैक्षणिक व इतर संस्था अशा विविध ठिकाणांहून तसेच मुख्य जलवाहिनी, भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र, जलकुंभ अशा ठिकाणांवरूनही पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करण्यात येत आहे. या गुणवत्ता चाचणीमध्ये पिण्याच्या पाण्यातील पीएच (pH), Turbidity, TDS (Total Disssolved Solids), Residual Cholrine इत्यादी घटकांची चाचणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८ ठिकाणी असलेल्या प्रयोगशाळांमध्ये करण्यात येत आहे. तसेच E-Coli ही चाचणी महानगरपालिकेच्या मध्यवर्ती प्रयोगशाळेत तसेच कोकण भवन येथील शासनाच्या प्रयोगशाळेमध्ये करण्यात येत आहे. सेक्टर ५० मलप्रक्रिया केंद्र येथील प्रयोगशाळेत पाणी नमुने तपासणीप्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता शंकर जाधव व वसंत पडघन, उपअभियंता सचिन शिंदे, उपअभियंता स्वप्निल देसाई, कनिष्ठ अभियंता किरण सानप व वैभव देशमुख उपस्थित होते. या मोहीमेत सर्वच विभागातील कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात ही मोहीम यशस्वी करण्यासाठी अनमोल योगदान दिले.




# आयुष्य घडविण्यासाठी संकल्प महत्वाचा : अविनाश धर्मधिकारी

## 'भव्य रोजगार मेळावा' मध्ये १८२८ उमेदवारांनी घेतला सहभाग

पनवेल : आयुष्य घडविण्यासाठी संकल्प महत्वपूर्ण असते. त्यामुळे स्वतःची ओळख, आवडते क्षेत्र आणि उत्तम व प्रतिभावंत होणे ही त्रिसूत्र अंगिकारा, अशी मार्गदर्शक सूचना माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी आज(दि. ०३) खांदा कॉलनी येथे झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना केली.

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त चांगू काना ठाकूर उच्च महाविद्यालय (स्वायत्त) आणि सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना १० वी, १२ वी नंतरच्या करिअरच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर 'मार्गदर्शन सत्र व विद्यार्थी संवाद' कार्यक्रम' त्याचबरोबरीने पाचवी ते पदवीधर असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या दृष्टिकोनातून 'भव्य रोजगार मेळावा' माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खांदा कॉलनी मधील चांगू काना ठाकूर उच्च महाविद्यालयात पार पडला. त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

अविनाश धर्माधिकारी यांनी पुढे बोलताना सांगितले कि, नमस्कार आणि सर्वांना सर्वकाळ सर्व शुभेच्छा हि जीवनातील दोन मंत्र आहेत. समोरच्या व्यक्तीला नमस्कार केल्याने आपल्यात आणि त्या व्यक्तीमध्ये ईश्वरी चैतन्य निर्माण होते तर दुसऱ्या मंत्रामुळे सर्व विश्वाचे कल्याण करण्याची शक्ती मिळते. सर्व विश्वाचे कल्याण करणारी आपली भारतीय संस्कृती आहे आणि जगाला कल्याणाची शिकवण आपल्या देशाने दिली आहे. संकल्प आपल्या आयुष्याला आकार देण्याचे काम करते आपण जसे व्यक्तिमत्व घडवू तसा जीवनाला आकार येते. माणूस म्हणून आपल्याला सन्मानाने जगता आले पाहिजे आणि त्यासाठीही संकल्प महत्वाचा असतो. सर्व करिअर चांगले आणि समान असतात, फक्त त्याची निवड आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार करणेही तेवढेच गरजेचे असते. आणि हे करताना बदलता काळही लक्षात घेतला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. शिक्षणातून करिअर करताना भारतमातेची सेवा झाली पाहिजे हेही आपल्या मनात रुजले पाहिजे आणि त्या अनुषंगाने केलेली वाटचाल मार्गदर्शक ठरणार आहे. जगात दिवसेंदिवस बदल बलाढ्य भारत आहे, त्यामुळे प्रत्येक तरुणाने त्याची जाणीव ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. विज्ञान पुढे जात आहे आणि त्यानुसार काळ बदलत आहे. त्यामुळे आपण निवडलेले क्षेत्र हे जीवनाला दिशा देणारे असले पाहिजे. त्यासाठी मेहनत घ्या आणि कुटुंबासोबत देशही महत्वाचा आहे त्या अनुषंगाने अविनाश धर्मधिकारी यांनी आपल्या अमूल्य मार्गदर्शनातून दिलेल्या सूचना आत्मसात करा, असे आवाहनही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.



घडत आहे आणि पुढील सहा वर्षात एआय विज्ञान क्षेत्रामुळे प्रचंड बदल होणार आहे. आणि तसा त्याचा परिणाम होणार आहे. एआय मुळे रोजगार कमी होणार असले तरी त्या क्षेत्रातील रोजगारांची निर्मितीही मोठ्या प्रमाणात होणार आहे, त्यामुळे त्याचाही वेध घेत त्यामध्येही करिअरची संधी असल्याचे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान बदलेल संधी बदलतील मात्र स्पर्धा परीक्षा कायम राहतील त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करावे.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हंटले कि, आपला देश विविध संस्कृतीने भरला आहे आणि या देशाचा सुजाण नागरिक होणे हि सर्वांची जबाबदारी आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना, अटल सेतू, आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीएमुळे आगामी पाच वर्षाच्या काळात या परिसरात जगातील विविध प्रकल्प येणार आहेत. तसेच या ठिकाणी असलेल्या अनेक विद्यापीठातून विविध शैक्षणिक कोर्सेस उपलब्ध आहेत. आणि त्या अनुषंगाने आजच्या विद्यार्थ्यांना संधीचे द्वार उपलब्ध होणार आहे. त्यानुसार परिसरात येणाऱ्या संधीचे सोने करण्यासाठी विद्यार्थांनी आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवावी, असे आवाहन केले. यावेळी पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी तर आभार प्रदर्शन स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख जे. एम. पावरा यांनी केले.

मलेरिया, डेंग्यूला रोखण्यासाठी २४ नागरी आरोग्य केंद्र परिसरातील

# विशेष तपासणी शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

नवी मुंबई : सद्यस्थितीत पावसाळा कालावधी सुरु असून हिवताप / डेंग्यू सारख्या किटकजन्य आजाराच्या डासांकरिता पोषक वातावरण तयार झाले आहे. हिवताप / डेंग्यूसारख्या किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्याकरिता आणखी ठोस उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज ३ ऑगस्ट रोजी आरोग्य विभागाच्या वतीने महानगरपालिकेच्या सर्व २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. पाऊस असूनही या शिबीरांना सर्वच ठिकाणी नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.




महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व आरोग्य विभाग प्रमुख वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात २४ ठिकाणी या विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आली होते. या शिबीरांना ८०५३ नागरीकांनी भेट दिली असून त्यांना हिवताप / डेंग्यू सारख्या किटकजन्य आजाराबाबत माहिती देण्यात आली तसेच १०२५ रक्त नमुने तपासणी करण्यात आले. यावेळी जनजागृतीकरिता हस्तपत्रके व पोस्टर्स यांचेही वाटप करण्यात आले.

# कौशल्य विकास योजनेला भर देणारा आहे : डॉ. राकेश पिसे

ठाणे : केंद्र सरकारचा २०२४-२५ चा अर्थसंकल्प हा शिक्षण, प्रशिक्षण यांना प्राधान्य देणारा आहे, आरोग्यदायी सुधारणांवर भर, नवीन वैद्यकीय संस्था निर्माण करण्यास प्रोत्साहन, सरकारने कौशल्यावर आधारित रोजगार निर्मिती लक्ष केंद्रित केले असून वेगवेगळ्या योजना लागू केल्या आहेत. आता नवीन स्वरूपाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रशिक्षण केंद्र सुरू करणे याच्यातून तांत्रिक स्वरूपाच्या ज्ञानावर भर दिलेला दिसून येत आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित कंपन्यांना रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करून दिली आहे, त्यामुळे बेरोजगारी कमी होऊन रोजगार वाढीस चालना मिळेल असे सकृत दर्शनी दिसून येते असे उद्गार डहाणूकर कॉलेजचे



अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉक्टर राकेश पिसे यांनी काढले. वाचन मंदिर व व टिळक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थसंकल्प २०२४ -२५ असा आहे केंद्रीय अर्थसंकल्प या विषयावर राकेश पिसे यांचे व्याख्यान टिळक मंदिर सभागृहात आयोजित केले होते, त्यावेळी पिसे बोलत होते. यावेळेला व्यासपीठावर वाचन मंदिराचे अध्यक्ष म्हणून सुधीर सिंगासणे, टिळक मंदिर विश्वस्त गणेश दांडेकर उपस्थित होते. प्रा.राकेश पिसे पुढे म्हणाले की, हा अर्थसंकल्प हा जास्त जास्तीत जास्त व्यवसाय, तांत्रिक कौशल्यावर आधारित असलेल्या विद्यार्थी वर्गाचा फायदा रोजगार निर्माण करणाऱ्या कंपन्या यांच्याकरता फायद्याचा आहे. देशातील कॅन्सर रुग्णांची संख्या लक्षात घेता कॅन्सरची औषध स्वस्त होणे ही बाब सगळ्यात महत्त्वाची आहे.या अर्थसंकल्पात लघु उद्यागाकरिता मुद्रा लोन वर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. यामुळे लघुउद्योजकांना चालना मिळेल, भांडवली खर्च वर वाढ ज्यामुळे देश विकासाकडे वाटचाल करीत आहे हे त्याचे लक्षण आहे. बिहार राज्याचे दरडोई उत्पन्न इतर राज्यांपेक्षा कमी आहे, त्यामुळे बिहारला चांगल्या प्रकारे अंदाजपत्रकात विशेष तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पावरील श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. पिसे यांनी फार चांगल्या प्रकारे उत्तर करून अर्थसंकल्प समजावून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्य मिलिंद पळसुले यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गोसावी यांनी केले.

# ठाण्यातील न्यू गर्ल्स स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ठरले राज्यातील पहिले लोकराज्य-कनिष्ठ महाविद्यालय

ठाणे : लोकराज्य या शासनाच्या मुखपत्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन पीपल्स एज्युकेशन सोसायटी, ठाणे संचलित न्यू गर्ल्स स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने याविषयी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. संस्थेचे अध्यक्ष आर.एस.आपटे, सचिव आल्हाद जोशी आणि उपसचिव बी.एस.तुरुकमाने यांनी या कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी व १२ वी च्या २५० विद्यार्थी-विद्यार्थिनींना लोकराज्य मासिकाचे सभासद बनवून या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. आणि या निर्णयास मूर्त स्वरूप देण्यासाठी या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किरणकुमार चव्हाण व त्यांच्या सहकारी प्राध्यापकांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. अशा प्रकारचे सदस्यत्व लोकराज्य मासिकाचे सदस्यत्व स्वीकारणारे हे कनिष्ठ महाविद्यालय आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील महाराष्ट्र राज्यातील पहिले कनिष्ठ महाविद्यालय ठरले आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटी, ठाणे, ही ठाण्यातील एक जुनी नावाजलेली






शैक्षणिक संस्था आहे. १९२६ साली न्यू इंग्लिश स्कूल, १९३६ मध्ये न्यू गर्ल्स स्कूल, १९५६ भारत नाईट स्कूल, १९७५ इंग्लिश मीडियम स्कूल, २०११ - सीबीएससी स्कूल (१), २०२२ - सीबीएससी स्कूल (२) या शाळांची पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेद्वारे स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचे ९८ वे वर्ष सुरू असून पुढील दोन वर्षांनी संस्थेचे शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. संस्थेतील विद्यार्थी हे अतिशय सर्वसामान्य कुटुंबातील असून या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास करताना महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या लोकाभिमुख निर्णयांची माहिती व्हावी, शासनाकडून जनतेसाठी कशा प्रकारचे निर्णय राबविले जातात, याची माहिती होण्यासाठी या मासिकाचे वाचन निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास संस्थेचे सचिव आल्हाद जोशी यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी राज्यातील इतर शाळा व महाविद्यालयांनाही अवघे १०० रुपये वार्षिक वर्गणी असलेल्या लोकराज्य मासिकाचे सभासद होण्यासाठी आवाहन केले आहे. या कनिष्ठ महाविद्यालयास येत्या दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभाच्या वेळी लोकराज्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१